# स्थानिक वृत्तपत्रांमध्ये डिजिटल व्यवहार करणेबाबत नागरिकांना आवाहन

# आणि

# महापालिकेच्या कार्यालयांच्या डिस्प्ले बोर्डवरही याबाबत नागरिकांना सूचना फलक

124.30.219.86/EpaperData/Sakal/Solapur/2018/09/07/Main/Sakal_Solapur_20

सकाळ

# पाच टक्के सवलतीचा ५९ हजार जणांनी घेतला लाभ

**सोलापूर, ता. ६ :** शहर व हद्दवाढ भागातील ५९ हजार ३८९ मिळकतदारांनी कर भरते वेळी मिळणाऱ्या पाच टक्के सवलतीचा लाभ घेतला. या सवलतीमुळे मिळकतदारांचा एक कोटी ६६ लाख ९१ हजार ४५२ रुपयांचा फायदा झाला.

महापालिका



महापालिकेने कर भरण्यासाठी १ एप्रिल ते ३१ ऑगस्ट या कालावधीत पाच टक्क्यांची सवलत दिली होती. त्याचा या मिळकतदारांनी फायदा घेतला. महापालिकेच्या कार्यालयात ५५ हजार १६४ जणांनी रोख आणि धनादेशाद्वारे रक्कम भरली. तर चार हजार २२५ जणांनी ऑनलाइन कर भरला. ३१ ऑगस्ट रोजी एकाच दिवसात पावणेदोन कोटी रुपयांचा भरणा झाला होता.

शहरात सुमारे ९४ हजार ४६३ तर हद्दवाढ भागात एक लाख पाच हजार ९८ मिळकती आहेत. बिल मिळो अथवा न मिळो बिल भरण्याचे आवाहन महापालिकेतर्फे दरवर्षी केले

पान ९ वर »

Solapur, Main
07/09/2018 Page No. 1






# पालिकेत डिजिटल पेमेंट प्रक्रिया सुरू

## धनवे ; एक ऑगस्टपासून संपूर्ण आर्थिक व्यवहार ऑनलाइन

**सोलापूर, ता. २३ :** 'स्मार्ट सिटी'अंतर्गत महापालिकेतील व्यवहार डिजिटल पद्धतीने करण्याची सुरवात सोमवारी झाली. दरम्यान, एक ऑगस्टपासून संपूर्ण आर्थिक व्यवहार ऑनलाइन होणार असल्याची माहिती मुख्य लेखापाल शिरीष धनवे यांनी दिली.

प्रायोगिक तत्त्वावर सोमवारी जन्म-मृत्यू दाखला, मिळकतकर भरण्यासाठी स्वाइप यंत्रावर पालिकेतीलच अधिकारी नागनाथ पदमगोंडा यांनी कर भरून या सुविधेची सुरवात केली. या वेळी श्री. धनवे यांच्यासह आयसीआयसीआय बॅंकेचे शाखा व्यवस्थापक जयदीप पेंटर, विशाल चव्हाण, संगणक परिचालिका स्नेहल चपळगावकर, मतीन शेख उपस्थित होते. विविध विभागांतील आर्थिक व्यवहार डिजिटल व ऑनलाइन करण्याचे संकेत आयुक्तांनी दिले होते. महापालिकेचे संपूर्ण आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार, सेवाशुल्क व इतर बाबी या ऑनलाइन व डिजिटल पद्धतीने करण्यात येणार आहेत. यानुसार महापालिकेतील जन्म-मृत्यू दाखला व मिळकतकर विभागात ऑनलाइन पद्धतीने स्वाइप मशिनद्वारे कामकाजाचा प्रायोगिक तत्त्वावर प्रारंभ करण्यात आला. या दोन विभागांबरोबरच आता मंगळवारपासून विविध विभागांतील कॅश काउंटरवरून ऑनलाइन पैसे भरून घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. कोणत्याही बाबीची रक्कमही ऑनलाइन पद्धतीने दिली किंवा घेतली जाणार असून यापुढे आता कोणत्याही प्रकारचे धनादेश अथवा रोख रक्कम स्वरूपात स्वीकारली किंवा दिली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

> **डिजिटल पेमेंट सुरू झाल्याने नागरिकांचा वेळ वाचणार आहे. तसेच बनावट नोटा जमा होण्याचा प्रश्नच राहणार नाही. पालिकेतील विविध कार्यालयात या पॉस मशिन बसविण्यात येणार आहेत.**
> **- शिरीष धनवे,** मुख्य लेखापाल



**सोलापूर : 'स्मार्ट सिटी'अंतर्गत महापालिकेत डिजिटल पेमेंट करताना नागनाथ पदमगोंडा. या वेळी शिरीष धनवे, जयदीप पेंटर, विशाल चव्हाण, स्नेहल चपळगावकर व मतीन शेख.**

# मिळकतदारांकडून प्रतिसाद

**सोलापूर / प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या वतीने सर्व आर्थिक व्यवहार डिजिटल करण्यात येत आहेत. पॉस मशीनसह ऑनलाईन पेमेंट पद्धतीने कर भरण्यासाठी नागरिकांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान ५ टक्के करात सूट असल्याने कर भरण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी पालिकेत दिसून आली.

महापालिकेच्या आर्थिक बाबींशी निगडित सर्व व्यवहार डिजिटल पेमेंट पद्धतीने करण्याच्या हालचाली सुरू होत्या. याच अनुषंगाने महापालिकेत डिजिटल पेमेंट प्रक्रियेला प्रारंभ करण्यात आला. विविध विभागातील कॅश काउंटरवरून ऑनलाईन पैसे भरून घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महापालिकेत भरणा करण्यात येणारी रक्कम यापुढे एटीएम कार्ड किंवा क्रेडिट कार्ड स्वैप करून घेतली गेल्यानंतर त्याचे बिलही संबंधितांना दिले जात आहे. दरम्यान, ३१ ऑगस्टपर्यंत महापालिका कर भरल्यास एकूण बिलाच्या ५ टक्के सवलत देण्यात



येत असल्याने कर भरण्यासाठी महापालिकेत मिळकतदारांची मोठी गर्दी दिसून आली. डिजिटल पेमेंट करणाऱ्यांना यापुढे १ टक्का अधिक सवलत देण्याचे नियोजन आहे. महापालिका सर्वसाधारण सभेत निर्णय झाल्यानंतर ही सवलत मिळकतदारांना मिळणार आहे.

यासाठी महापालिकेचे आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य लेखापाल शिरीष धनवे, आयसीआयसीआय बँकेचे शाखा व्यवस्थापक जयदीप पेंटर, विशाल चव्हाण, महापालिकेचे डिजिटल पेमेंट नोडल अधिकारी नागनाथ पदमगोंडे, संगणक विभागातील अधिकारी चपळगावकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी प्रयत्नशील आहेत.

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

### * बांधकाम परवानगी विभाग *

**मा. शासनाचे दि. ०९/०७/२०१८ चे आदेशानुसार डिजीटल पेमेंट व कॅशलेशद्वारे आर्थिक व्यवहार करण्याचे निर्देशास अनुसरुन बांधकाम परवानगी विभागाकडील सर्व प्रकारचे विकास विषयक परवानगी करीता विकास शुल्क यापुढे**

**RTGS, NEFT, Credit Card, Debit Card, Internet Banking, Bhim Aadhar,**



**(Bhim App, Paytm, Mobikwik, Freecharge, PhonePe)**

BHIM UPI · Paytm · MobiKwik · freecharge · PhonePe



**या आपल्या बँकेमधुन व मोबाईल ॲप द्वारे भरावे.**

**यापुढे कोणतेही शुल्क चेक, धनाकर्ष अथवा रोखीने स्वीकारले जाणार नाही.** [redacted]